

दित

गत

रवींद्र जोशी,
शी, अनिरुद्ध
धर दाबके,
वार विजयी

पेठे, वेदा
कर, सागर
वडून आले
ाहे. दापोली
भागृहात ही

# गोगटे महाविद्यालयास पुरस्कार

## सायबर सुरक्षेबाबत जनजागृतीचे कार्याची दखल

**सकाळ वृत्तसेवा**

रत्नागिरी, ता. १४ : पुणे येथे क्विक हिल फाउंडेशनमार्फत सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा ॲवॉर्ड सोहळ्यात बेस्ट मीडिया अँड आउटरीच ॲवॉर्ड गोगटे-जोगळेकर महाविद्यालयास देऊन सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार फाउंडेशनच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनुपमा काटकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

महाविद्यालयाच्या संगणकशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी क्विक हिल फाउंडेशनच्यावतीने सायबर सुरक्षा जागरूकता महिन्याचे औचित्य साधून सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या विषयावर कमवा आणि शिका योजनेंतर्गत महाविद्यालय येथे प्रशिक्षण घेण्यात आले होते. १२० विद्यार्थ्यांनी या प्रशिक्षणात सहभाग घेतला होता. त्या प्रशिक्षणामध्ये




पुणे : क्विक हिल फाउंडेशनच्यावतीने अनुपमा काटकर यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना अनुजा घारपुरे, प्रा. केतन जोगळेकर, प्रा. सुदीप कांबळी व विद्यार्थी.

सुमारे ४२ विद्यार्थी सायबर वॉरियर म्हणून निवडून आले होते. या ४२ सायबर वॉरियरनी जिल्ह्यातील १०० शाळा/महाविद्यालयांमध्ये २१ हजार विद्यार्थ्यांचे सुमारे १ हजार नागरिकांचे सायबर जागरूकतेतून प्रबोधन केले.

या कार्याची दखल घेऊन क्विक हिल फाउंडेशनने गोगटे-जोगळेकर महाविद्यालयातील पार्थ मुळे, तौकिर दर्वे, तन्वी सुतार आणि तीर्था शिवलकर हे विद्यार्थी तसेच प्रा. केतन जोगळेकर आणि प्रा. सुदीप कांबळी यांना नामांकन होते. त्यापैकी तन्वी सुतार आणि तीर्था शिवलकर या दोन विद्यार्थिनींना बेस्ट प्रोसेस कम्प्लायन्स विजेता तर प्रा. केतन जोगळेकर आणि प्रा. सुदीप कांबळी यांना बेस्ट प्रोसेस कम्प्लायन्स (रनर अप), महाविद्यालयाकरिता बेस्ट मीडिया अँड आउटरीच विजेता हे ॲवॉर्ड मिळाले.